# महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग
## राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय
## डॉ. नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-४११००१.

सत्यमेव जयते

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा निबंधक विवाह मंडळ व विवाह
(विभागस्तरीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎:- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्रमांक :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल :- mahvivah@gmail.com


क्र.आमाजिआ/कक्ष-८ २/विनोंका/मयत जोडीदार/6778-6813/१६
दिनांक -20/०६ /२०१६.

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ....................(सर्व)

विषय :- विवाह नोंदणी करतांना पक्षकारापैकी एक हयात नसलेस मार्गदर्शना बाबत...

संदर्भ :- नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक पुणे यांचे पत्र जा.क्रं.का-९ /आस्था-७ /२०१६ /१९० दिनांक ०६/०६/२०१६.

महोदय,

विषयांकित प्रकरणी या कार्यालयाने विवाह महानिबंधक तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय नविन प्रशासकीय इमारत,तळमजला,कॉन्सील हॉल समोर,पुणे कडे पक्षकारापैकी एक पक्षकार मयत असल्याने त्यांच्या विवाहाची नोंद कशा प्रकारे करावी व याबाबत मार्गदर्शन मिळणेकरीता विचारणा केली असता, त्यांनी खालील नमुद केल्या प्रमाणे कळविलेले आहे.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ मधील कलम ६ (१) (ख) मध्ये "विवाहातील पक्षकार आणि तीन साक्षीदार निबंधकासमोर व्यक्तिशः उपस्थित रहातील आणि ज्ञापनावर सही करतील" अशी तरतुद आहे. तथापी पक्षकारांपैकी एक पक्षकार हयात नसेल तर विवाह नोंदणी करता येइल कां? याबाबतची स्पष्ट तरतूद उक्त अधिनियमात नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ मध्ये याबाबतची तरतूदस्पष्ट नसल्यामुळे राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाकडे अशा प्रकरणांसाठी मार्गदर्शन मागविण्याचे प्रस्तावित आहे. राज्य शासनाकडुन मार्गदर्शन प्राप्त होताच, सर्व विवाह निबंधकांना या कार्यालयाकडुन सुचना देण्यात येतील.

तेव्हा आपण जिल्हयातील सर्व ग्रामीण व शहरी भागातील विवाह निबंधकांना सुचना देण्याची तजवीज कारवी.

20/6/16

उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), तथा
निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (विभागीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत सादर :-

१) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्य स्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.